राष्ट्रीय विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक
महासत्ता

# देवचंद कॉलेजच्या चार विद्यार्थ्यांची निवड

निपाणी,ता.२६(प्रतिनिधी)-

..............................

**देवचंद कॉलेज, अर्जुननगर आणि क्विक हील फाउंडेशन, पुणे यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. या करारांतर्गत संगणकशास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांची क्विक हील फाउंडेशन, पुणे तर्फे क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली.**



क्लब ऑफिसर म्हणून निवड झालेले ४ विद्यार्थी व १६ सायबर वॉरियर्स असे एकूण २० विद्यार्थी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

संगणकशास्त्र विभागातील रुद्र सुतार (प्रेसिडेंट), ज्योती भोंगाळे (सेक्रेटरी), मधुरा पुंडे (कम्युनिटी डायरेक्टर), प्रतीक्षा नाईक (मीडिया डायरेक्टर), आणि प्रा.प्रशांत कुंभार (समन्वयक) यांच्यावर या उपक्रमाचे नेतृत्व सोपविण्यात आले आहे.

या उपक्रमास जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिष शाह, उपाध्यक्षा तृप्ती शाह यांचे प्रोत्साहन लाभले. प्रभारी प्राचार्य डॉ.आर. एम.साळुंखे, स्वप्नील पोतदार यांचे मार्गदर्शन मिळाले.

MAHASATTA EPAPER
Kolhapur, Sangli, Satara, Belgaum Edition.
Date : 27-06-2026 Page No. - Mahasatta_5